# ई निविदा सूचना

## श्री दुर्गामाता मंदिर ,जालना परिसरातील मोकळी जागा नवरात्र उत्सव २०२४ करीता भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणे बाबत

१. पोलीस प्रशिक्षण केंद्र जालना यांच्या ताब्यातील दुर्गामाता मंदिर,झाशी रानी पुतळा जवळ, जालना परिसरातील मोकळी जागा नवरात्र उत्सव २०२४ करीता आनंद नगरी मेळावा भरविणेकरीता भाडे तत्वावर देण्याबाबत ठेका देण्या करीता ईच्छुक व सक्षम ठेकेदारांकडुन ई निविदा माध्यमातुन देकार(निविदा) मागविण्यात येत आहे. सदर बाबीस मा.जिल्हाधिकारी, जालना कार्यालयाची परवानगी येण्याचे आधीन राहुन सदर निविदा मागविण्यात येत आहे. निविदा बाबतचा तपशिल खालील वेळापत्रकाप्रमाणे ई निविदा https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने भराव्यात. ई निविदा प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र जालना यांच्या दालनात निविदाधारका समक्ष ऑनलाईन पध्दतीने खालील वेळापत्रकानुसार आवश्यक झाल्यास उघडण्यात येतील. या निविदेची अंदाजित रक्कम रु. ३० लक्ष (अक्षरी रुपये तीस लक्ष फक्त) इतकी असुन यापेक्षा अधिक रक्कम ज्या निविदा धारकाची असेल त्यांचे नावे निविदा अंतिम करण्यात येईल.

| अक्रं. | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | प्रसिध्दी दिनांक | १९.९.२०२४ |
| ०२ | दस्तऐवज डाऊनलोड | १९.९.२०२४ |
| ०३ | निविदा स्विकारण्याचा दिनांक पासुन | १९.९.२०२४ |
| ०४ | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | २७.९.२०२४ |
| ०५ | निविदा उघडण्याचा अंतिम दिनांक | ३०.९.२०२४ रोजी १५०० |

### निविदा विक्री बाबत

२. ई निविदा(ई-टेंडर) चे फॉर्म उक्त वेळापत्रका प्रमाणे या कालावधीत नापरतावा रक्कम रुपये ३०००/- (अक्षरी रुपये तीन हजार फक्त) एवढी रक्कम ऑनलाईन जमा करणे आवश्यक आहे. त्यासाठी ऑनलाईन गेटवे उपलब्ध करुन देण्यात आला आहे. फॉर्मची रक्कम ऑनलाईन https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर असलेल्या ऑनलाईन बँकीग पर्याय मार्फतच जमा करावे तसेच अनामत रक्कम (E.M.D.) रुपये ५,००,०००/-( अक्षरी रुपये पाच लाख फक्त) चे राष्ट्रीयकृत बँकेचा मुळ डीमांड ड्राफ्ट PRINCIPAL,POLICE TRAINING SCHOOL JALNAP या नावाने दिनांक २७.९.२०२४ रोजी १५०० वाजेपावेतो आवश्यक सर्व कागदपत्रासह पोलीस प्रशिक्षण केंद्र जालना येथे सादर करणे आवश्यक आहे.

### ई-निविदा संबंधी सूचना

३. ई निविदा दोन लिफाफे पध्दतीने भरावी लागेल यामध्ये लिफाफा क्रं.१ तांत्रिक निविदेचा लिफाफा आणि लिफाफा क्रं.२ यात निविदाची देकार रक्कम भरण्यात यावी. त्याचा तपशिल खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

४. <u>लिफाफा क्रं.(१)</u>

१. या लिफाफयात ई निविदा फॉर्म शुल्कची नापरतावा रक्कम रु.३०००/- (अक्षरी रुपये तीन हजार फक्त)ऑनलाईन जमा केलेली पावती/ चलनाची स्कॅन प्रत अपलोड करावी.

Scanned with CamScanner

२. अनामत रक्कम रुपये ५,००,०००/-( अक्षरी रुपये पाच लाख फक्त) चे राष्ट्रीयकृत बँकेचा डीमांड ड्राफट PRINCIPAL,POLICE TRAINING SCHOOL JALNAP या नावाने असलेला डीडी ची स्कॅनप्रत अपलोड करावी.
३. निविदा घेणारी संस्था/एजंसी असल्यास नोंदणीकृत संस्थेचे लायसंस ची स्कॅनप्रत अपलोड करावी.
४. ज्या संस्थेस शासन नियमाप्रमाणे बयाना(अनामत) रक्कम भरण्यापासुन सुट मिळाली असल्यास संस्थेने या संबंधीचे चालु तारखेचे प्रमाणपत्राची सत्यप्रत अपलोड करावी.
५. आयकर विभागाचा पॅन कार्ड व चालु वर्षाचा I.T.Clearance certificate ची स्कॅनप्रत तसेच आधार कार्डचीप्रत अपलोड करावी.
६. रहीवासी पुरावा म्हणुन मागील महिन्याचे विजबिल/टेलीफोन बिल पैकी एकाची स्कॅनप्रत अपलोड करावी.
७. काळया यादीत नाव समाविष्ट नसल्याचे घोषणापत्र (Affidavit) ची स्कॅनप्रत अपलोड करावी.
८. अनुभव प्रमाणपत्र असल्यास स्कॅन प्रत अपलोड करावी.

ज्या निविदा धारकाचे ई निविदा लिफाफा क्रमांक १ मध्ये वरील नमुद कागदपत्र नसेल त्यांचे लिफाफा क्रमांक २ उघडले जाणार नाही. याबाबत अंतिम निर्णय प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना यांचा राहील.

**(ब) लिफाफा क्रमांक २**

या लिफाफयामध्ये ई निविदा फॉर्म मध्ये विहीत केलेल्या प्रपत्रात देकार रक्कम भरण्यात यावी. ई निविदा धारकाने दुर्गामाता मंदिर परिसरातील मोकळी जागा भाडे तत्वावर मिळणेसाठीचे दर भरुन c फाईल अपलोड करावी . मुळ प्रत सादर करु नये (No hard copy should be submitted)

( टिप :- वरील लिफाफा क्रमांक १ मधील सर्व आवश्यक कागदपत्र व रु.५.० लक्ष (अक्षरी रुपये पाच लाख फक्त) डीमांड ड्राफट ई ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक असुन, फक्त मुळ डीमांड ड्राफट निविदा उघडण्याचे तारखेपर्यंत दिं.३०.९.२०२४ रोजी दुपारी १५०० वा.पर्यंत प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे सादर करणे बंधनकारक राहील. लिफाफा क्रमांक १ मधील सर्व अटीची पुर्तता झाल्यास लिफाफा क्रं.२ उघडण्यात येईल.)

४ ज्या ठेकेदाराची ई निविदा स्विकारण्यात येईल त्यास ही निविदा रक्कम (अमल दखल) निविदा मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकापासुन खालील प्रमाणे भरावी लागेल.

| अक्रं. | दिवस | दर्शविलेल्या रोजी भरावयाची अदयावत रक्कम. |
|---|---|---|
| ०१ | ई निविदा मंजुरीच्या रोजी | संपुर्ण रक्कम |

ई निविदा मंजुरीच्या रोजी संपुर्ण रक्कम डीमांड ड्राफट PRINCIPAL,POLICE TRAINING SCHOOL JALNAP या नावे भरावी लागेल. वेळीच रक्कम न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. याबाबतचा प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र जालना यांचा निर्णय अंतिम राहील.

## निविदा सादर करणे बाबतचे नियम व अटी

१. ज्या निविदाधारकाची निवीदा मंजुर करण्यांत येईल त्या निवीदाधारक यांनी काही कारणास्तव कंत्राट घेण्यास नकार दिल्यास अनामत रक्कम म्हणुन भरण्यांत आलेली रक्कम परत करणे बाबत प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र जालना यांचा निर्णय अंतिम राहील.
२. निविदा मंजुरी नंतर संपुर्ण रक्कम भरल्या नंतरच मंजुर निवीदाधारकास निवीदा मंजुरीचा आदेश देण्यांत येईल.

Scanned with CamScanner

३. निवीदा स्विकारणे अथवा काही एक कारण न देता नाकारणे या बाबतचे सर्व अधिकार प्राचार्य ,पोलीस प्रशिक्षण केंद्र जालना यांना राहील.

४. निवीदा मंजुर करण्यांत आल्या नंतर इतर कार्यालयाचे आवश्यक असलेले सर्व परवाने स्वत: निवीदाधारकास काढावे लागतील. आवश्यक तो सर्व कर भरण्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील.

५. निविदा मंजुर करण्यांत आल्या नंतर आगी विषयक काळजी ,आरोग्य विषयक, स्वच्छता सुविधा,भाविकांच्या सुरक्षेची संपुर्ण जबाबदारी, वाहतुक व्यवस्था करणे, येणा-या वाहनाची पार्कींग व्यवस्था करणे, दररोज निर्माण होणा-या कच-याची विल्हेवाट लावणे, डस्टबिन ठेवणे, तसेच अग्नीशामक दलाच्या वाहनास येण्याजाण्यासाठी पुरेसा रस्ता या बाबतची सर्व जबाबदारी ही कंत्राटदार यांची राहील. तसेच कोणासही विदयुत शॉक लागणार नाही ,कोणतीही जिवित हानी/इजा होणार नाही याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदार यांची राहील यासंबंधी वाद निर्माण झाल्यास संपुर्ण कायदेशिर कार्यवाही /दंड यास कंत्राटदार जबावदार राहतील यासंबंधीचा सर्व खर्च कंत्राटदार यांनाच करावा लागेल.

६. नवरात्र उत्सव दरम्यान कोणत्याही प्रकारचा जुगार ,अवैध धंदे , अंमली पदार्थ विक्री, वेश्या व्यवसाय इ.अवैद्य व्यापार चालणार नाही याची निविदाधारक यांनी नोंद घेण्यात यावी. असे आढळुन आल्यास कंत्राटदारास जबाबदार धरुन कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

७. कोणताही स्टॉल धारक हा विजेच्या तारेवर आकडे टाकुन विजेची चोरी करणार नाही, खुले वायर ठेवणार नाही , कोणत्याही इसमास विजेचा शॉक बसणार नाही, स्पार्कींग होणार नाही याची दक्षता निवीदाधारक घेतील. सदर आनंदनगरी मध्ये व्यवसाय करणारे व्यावसायिक/कलाकार ई कडुन बळजबरीने, धाक दाखवुन,दमदाटी करुन रक्कम वसुल करता येणार नाही. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास कायदेशिर कार्यवाहीस कंत्राटदार पात्र राहतील. सदर आनंदनगरी मेळाव्या मध्ये काही अनुचित घटना घडलयास त्यास पोलीस प्रशिक्षण केंद्र जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी निवीदाधारकावर राहील.सदर बाबत निवीदाधारक यांनी योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे राहील.

८. मुली व महीला भाविकांशी छेडाछाडीचे प्रकार होवु देऊ नये तसेच महीलाच्या सुरक्षितेबाबत योग्य ती दक्षता आयोजकाकडुन घेण्यात यावी यामध्ये काही अनुचित प्रकार आढळुन आल्यास कंत्राटदारास जबाबदार धरण्यात येवुन कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

९. निवीदाधारक हे लहान मुल हरवले अथवा सापडले हे जनतेस कळविण्यासाठी यात्रेच्या ठीकाणी पब्लीक अनाऊसमेंन्ट करीता स्टेज उभारुन तेथे स्वयंसेवक /सभासद नियुक्त करतील

१०. खाद्य पदार्थ तयार करुन विक्री करणारे स्टॉल धारक हे घरघुती गॅस सिलेंडचा वापर न करता व्यावसायीक गॅस सिलेंडरचा वापर करतील , तसेच सिलेंडर वापरतांना त्याबाबत अनुचित प्रकार घडणार नाही याबाबत संपुर्ण सुरक्षेचे नियम पाळतील याची दक्षता निविदा धारक घेतील .

११. पाकीटमार भुरटेचोर ,मंगळसुत्र चोर याच्यावर वॉच ठेवण्याकरीता सी सी टी व्ही कॅमेरे बसवतील तसेच त्यासाठी कंट्रोलरुम तयार करुन मॉनिटरींग करीता निवीदाधारक हे कर्मचारी नेमणुक करतील.

१२. ऐनवेळी विदयुत पुरवठा खंडीत झाल्यास जनरेटर बॅकअप सिस्टिम उपलब्ध ठेवुन त्याचा वापर करतील.

१३. यात्रेदरम्यान उभारण्यात आलेले स्टॉल पेन्डॉल ई. हे तात्पुरत्या स्वरुपाचे असतील. यात्रा संपल्यावर ताबडतोब सदरचे स्टॉल पेन्डॉल काढुन घेण्याची जबाबदारी निवीदाधारकाची असेल.

१४. कोणताही घातपाताचा प्रकार होणार नाही त्याकरीता जास्तीत जास्त प्रमाणात खाजगी सुरक्षारक्षक तसेच स्वयंसेवकाची नियुक्ती आयोजक यात्रे दरम्यान करतील.

Scanned with CamScanner

१५. यात्रेदरम्यान गर्दीच्या ठिकाणी चेंगराचेंगरी सारखा प्रकार घडण्याची दाट शक्यता असते सदर ठिकाणी आयोजक हे जास्तीत जास्त स्वयंसेवक नियुक्ती करुन तिथे कोणताही अनुचीत प्रकार घडणार नाही याची दक्षता घेतील.

१६. नमुद केलेल्या अटी व शर्तीचे पालन नवरात्र उत्सवा दरम्यान झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ निविदाधारक यांचे कंत्राट रदद करण्यात येईल व कंत्राटदाराचे यांना दयावयाचे रक्कमे बाबत प्राचार्य ,पोलीस प्रशिक्षण केंद्र जालना यांचा निर्णय अंतिम राहील.

१७. नवरात्र उत्सव संपल्यानंतर सदरची जागा संपुर्णपणे स्वच्छ करुन देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. असे करण्यास कंत्राटदार यांनी कसूर केल्यास त्यांचे अनामत रक्कमेमधुन आवश्यक रक्कम वसुल करण्यात येईल.

१८. कंत्राटदार यांना वर नमुद सर्व नियम व अटी मान्य असल्याचे रु.१००/-(रुपये शंभर फक्त) चे बाँडवर लेखी देवुन करार करावा लागेल.

१९. या संबंधी पुढील सुचना/आदेश https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

( अशोक बनकर )
प्राचार्य,
पोलीस प्रशिक्षण केंद्र,जालना.

Scanned with CamScanner